- नि:पक्षपात स्त्रीवादी (Equity Feminists) - उदारमतवादी स्त्रीवादी पुरस्कर्त्यांनी 'नि:पक्षपात स्त्रिवाद' असा उल्लेख केला त्यांच्या मते १. स्त्रीयांना पुरूषांइतकेच स्वातंत्र्य आणि संधी मिळायला पाहिजे आणि स्त्री-पुरुष यांच्यातील भेदासंदर्भातील कायदे रद्द झाले पाहिजेत.

  २. कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानावर आधारित केवळ आर्थिक क्षेत्रापुरते नव्हे तर मानवाची स्त्री आणि पुरुष अशा गटातील विभागणीचे कायदेसुद्धा रद्द झाले पाहिजेत.
- जैवशास्त्राच्या दृष्टीने मानवाची दोन लिंगामध्ये विभागणीत पाच शारीरिक घटक महत्वाचे आहेत. १) जीन्स २) हार्मोन्स ३) जनन ग्रंथी (gonads) ४) अंतर्गत प्रजनन अवयव ५) बाह्य प्रजनन अवयव.
- लिंगभाव एक सामाजिक रचना (Gender is a Social Construction) लामा (Llama) यांच्या मते स्त्री, पुरुष, मर्दानी आणि स्त्रिलिंगी ही केवळ सांस्कृतिक रचना आहे. भिन्नलिंगी आकर्षण हे नैसर्गिक आहे. लैंगिकता ही केवळ व सामाजिक रचना आहे.
- स्त्री मुक्ती - काटे बॉर्नेस्टीन (Kate Borne stein) यांच्या मते स्त्रियांना मुक्त करण्याचा मार्ग म्हणजे लिंगभाव अरचना होय. बाह्य अवयवाद्वारे जैविक लिंग निश्चित होत नाही तर अनुवंशिक रचनेमुळे जैविक लिंग निश्चित होते.

	c) Contemporary period- Recommendations of policy initiatives commissions and committees schemes, programmers and plans after 1986. क) समकालीन कालखंड: १९८६ नंतरच्या आयोग, समित्या, योजना, कार्यक्रम व आराखडे यांनी केलेल्या शिफारशी व धोरणात्मक पुढाकार	

अ) स्वातंत्र्यपूर्व काळातील आयोग/समित्यांचा आढावा - १९७५ ते १९८५ हे स्त्री विकास दशक म्हणून जाहिर करण्यात आले.

- लॉर्ड बेंटिंकने सती प्रथा बंद केली
- लॉर्ड डलहौसीने इ.स. १८५० मध्ये इंग्रज सरकारने भारतीय स्त्री शिक्षणाला मदत करण्याची शिफ़ारस केली.
- वुडचा खलिता (१८५४) व स्टॅनलेचा खलिता (१८५९) यामुळे स्त्री शिक्षणावरील दुर्लक्ष कमी - मुलींसाठी प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू
- १८७० मध्ये मेरी कारपेण्टर यांच्या प्रयत्नातून पहिले प्रशिक्षण महाविद्यालय सुरू केले.

- १८८२ च्या भारतीय शिक्षण आयोगाने खाजगी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या अनुदानात वाढ केली. प्रशिक्षण, शिक्षिका होणाऱ्या मुलींना पारितोषिक देण्याची शिफ़ारस केली.
- १९१६ मध्ये महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली. श्रीमती नाथबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ मुंबई अर्थात एस.एन.डी.टी. विद्यापीठ
- कलकत्ता विद्यापीठ आयोग (१९१७) च्या शिफारशीनुसार स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ, अभ्यासक्रम, शाळा, शिक्षक प्रशिक्षणाची सोय, वैद्यकीय शिक्षण इत्यादींसाठी प्रयत्न झाले.
- १९२९ मध्ये हरटॉग समितीने ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाच्या अपुऱ्या सोईसुविधांकडे लक्ष वेधले.
- १९४४ सार्जंट प्लॅनमध्ये मुले मुली यांच्यासाठी समान शिक्षण असावे असे म्हटले आहे.

ब. स्वातंत्र्योत्तर काळातील आयोग/समित्या, शासकीय धोरणे, योजना कार्यक्रम

१. विद्यापीठ आयोग (१९४८-४९) स्त्री पुरुषांच्या शिक्षणात समानता असावी तसेच शिक्षणासाठी विविध सुविधा असाव्यात अशी शिफारस आयोगाने केली.

२. माध्यमिक शिक्षण आयोग डॉ. ए. लक्ष्मणशास्त्री मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने माध्यमिक शिक्षणाचा विचार करताना पुरूष व स्त्रीयांचे शिक्षण सारखे असावे. स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा, सहशिक्षण, स्त्री-शिक्षकांची व्यवस्था, स्वतंत्र स्वच्छतागृहे, क्रीडा मैदाने, सहशालेय उपक्रमांचे आयोजन करावे यासारख्या शिफारशी केल्या.

३. स्त्री-शिक्षणासाठीची राष्ट्रीय समिती (१९५७) - भारत सरकारने राष्ट्रीय स्तरावर दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली स्त्री शिक्षण समिती नेमली. पुरुष व स्त्री यांच्या शिक्षणातील तफावत दूर करणे स्त्री शिक्षणासाठी आर्थिक तरतूद, मुलींना मोफत शिक्षण, स्त्रीयांसाठी व्यावसायिक शिक्षण देण्यात यावे. या शिफारशी केल्या.

४. मुले व मुली यांच्या अभ्यासक्रमातील भेदासंबंधी समिती (१९६१) श्रीमती हंसा मेहता यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या समितीने 'मुले व मुली यांच्या बौद्धीक अथवा मानसशास्त्रीय क्षमतेत कोणताही फरक नसतो. मुलामुलींच्या अभ्यासक्रमात भेद असू नये; त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात यावे., माध्यमिक स्तरावर लैंगिक शिक्षण दिले जावे.

५. ग्रामीण भागातील मुलींच्या-शिक्षणासाठी जनतेच्या सहाय्याच्या अभावाची कारणे शोधण्यासाठी नेमलेली समिती (१९६३) - श्री.एम.भक्त वत्सलम यांच्या अध्यक्षतेखाली ही समीती नेमली. यांच्या मते समाजाकडून स्त्री शिक्षणाबाबतीत सहकार्य मिळवले पाहिजे. तसेच स्त्री शिक्षकांची नेमणूक, समाजाचा सहभाग, शाळेच्या वेळात लवचिकता इ. बाबींची योजना करावी.

६. कोठारी आयोग/भारतीय शिक्षण आयोग (१९६४-६६) - डॉ.डी.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या आयोगाने मुली आणि स्त्री शिक्षणाच्या आतापर्यंतच्या सर्व समितींच्या शिफ़ारसींना पाठिंबा दिला.

७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) **-** हे धोरण सर्वसमावेशक व व्यापक असून स्त्री शिक्षणाचा व्यापक विचार करणारे पहिले राष्ट्रीय धोरण आहे. स्त्री सबलीकरणासाठी शिक्षण महत्वाचे माध्यम आहे यावर भर देण्यात आला. 'स्त्रियांचा दर्जा उंचावण्याचे एक प्रमुख साधन म्हणून शिक्षण काम करेल अशी स्पष्ट ग्वाही या धोरणांतर्गत दिली गेली.'

८. कृती कार्यक्रम - यात स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले आहे. १९९० पर्यंत मुलींना शिक्षण देणारा टप्प्याटप्प्याचा पण कालबद्ध कार्यक्रम व १९९५ पर्यंत उच्च प्राथमिक शिक्षण देणारा कार्यक्रम १९९५ पर्यंत १५ ते ३५ वयोगटातील स्त्रियांना प्रौढ शिक्षण देणारा कार्यक्रम तयार करण्यात आला. तसेच स्त्रीविषयक अभ्यासाला प्रोत्साहन, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, प्रौढ शिक्षण वर्ग, निरंतर शिक्षण केंद्राची स्थापना, सर्व राज्यात स्त्री विभाग स्थापना इ. उपाय सुचविण्यात आले.

९. राममूर्ती समिती (१९९०) - या समितीने शिक्षणातून समानता, स्त्री शिक्षणातील जनसंपर्क साधनांची भूमिका, मुलींसाठी व्यावसायिक शिक्षण, शिक्षक प्रशिक्षणातून स्त्रियांच्या शैक्षणिक समस्येची जाणीव, स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना इ. बाबींवर भर दिला.

१०. कृती कार्यक्रम (१९९२) - शिक्षणापासून वंचित घटकांना विशेषत: मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आले. त्यानुसार शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना विशेष सवलती, पुस्तकपेढी, अतिदुर्गम क्षेत्रात निवासी शाळा इ. बाबींवर भर देण्यात आला.

---

११. महिला धोरण (१९९४)

महिला धोरण जाहिर करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे.

ध्येये व उद्दिष्टे

- महाराष्ट्र राज्यातील स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारणे
- विकासातील असमतोल नाहिसा करणे आणि स्त्रियांना त्याच्या संपूर्ण क्षमतेची जाण व्हावी यासाठी शासनाने सर्वतोपरी प्रयत्न करणे.
- समाजाच्या गरजा व वास्तव लक्षात घेऊन स्त्री-पुरुषांच्या (भूमिका व संबंधाच्या) प्रचलित पंरपरा, संकल्पना बदलविण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाने घ्यावी व समाजातील एक उत्पादक घटक म्हणून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबर अधिकार दिले जावेत.

उपाययोजना

- जिल्हा परिषदांमध्ये महिला आणि बालकल्याण विकास समिती निर्माण करण्यात आल्या.
- अध्यक्षपद महिलांकडे ठेवावे, ७०% महिला सदस्य असणे हे निश्चित करण्यात आले.
- महिला व बालकल्याण हा स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला.

- महिला समितीच्या हातात १०% जमीन, १०% उत्पन्नाचा विनियोग करण्याचे अधिकार देण्यात आले.
- ५०% महिलांनी मागणी केल्यास दारुची दुकाने बंद करण्यात येतील.
- नोकरीत स्त्रियांना ३०% आरक्षण देण्यात आले.
- महिलांवरील आत्याचाराचे निर्मूलन, कायद्याने समान हक्क, महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, हिंसाचार टाळण्यासाठी महिलांची पोलीस खात्यात भरती करणे, माहेर योजना निराधार स्त्रियांसाठी निर्माण करण्यात आली.
- भारत सरकारने ७३ व ७४ वी करून नागरी व ग्रामीण संस्थेत महिलांसाठी १/३ आरक्षण ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

१२. महिला धोरण (२००१)

२००१ हे वर्ष भारत सरकारने 'महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषीत केल्यानंतर २००१ मध्ये महाराष्ट्र शासनाने नवे महिला धोरण जाहीर केले.

या धोरणात महत्वपूर्ण बाबी

- २००२-२००३ या आर्थिक वर्षापासून स्त्रीकेंद्रीत नियोजनावर भर दिला जाईल.
- महिलांना सक्षम करण्यासाठी अर्थसंकल्प तरतूद तसेच महिला कोषाची स्थापना करण्यात येईल.
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीमध्ये महिलांच्या घरकामाच्या मूल्याचा समावेश करण्यात येईल.
- स्थानिक स्वराज्य संस्था प्रमाणे अन्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण जाहीर करण्यात येईल.
- महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयंसहायता बचत गटांची निर्मितीवर भर देण्यात येईल.
- शासकीय, निमशासकीय, सहकारी संस्था, शिक्षण संस्था इत्यादींनी महिलांच्या सक्षमतेसाठी प्रयत्न करणे बंधनकारक आहे.
- सर्व संस्था, महिलांना सक्षम करण्यासाठीच्या कृती कार्यक्रमाची सनद (चार्टर फॉर वुमन) तयार करतील. ३ जानेवारी दिनी संस्था या सनदेचा आढावा घेऊन सनदेस मान्यता देतील.
- महानगरपालिका, नगरपालिकांमध्ये महिला विकास कार्यक्रमाचा बृहत आराखडा केला जाईल. महिलांना समिती सदस्यत्व मिळेल.
- व्यसनमुक्तीमध्ये ५०% महिलांनी मागणी केल्यास दारुची दुकाने बंद करावी लागतील.
- महिलांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने महिला संरक्षण विधेयक, राज्यस्तरीय कृती दल, महिला समुपदेशक केंद्राची स्थापना, हुंडा प्रतिबंधक कार्यक्रम व देवदासी, परित्यक्ता महिलांच्या पुनर्वसनासाठी विशेष योजना देण्यात येतील.

- मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य व गती देण्यासाठी सर्व शिक्षा अभियानाचे कार्यक्रम, गळती व स्थगिती थांबविण्यासाठी विशेष प्रयत्न, मुलींना स्वतंत्र प्रसाधनगृह, वैद्यकीय तपासणी, खेळांमध्ये मुलींचे प्रमाण वाढावे यासाठी विशेष केले जातील.
- आरोग्या बाबत विशेष कार्यक्रम - महिला रुग्णालये, गरोदर मातांची काळजी, महिलांसाठी विशेष आरोग्यसेवा, किशोरी मेळावे, आरोग्य तपासणी - जनजागृती कार्यक्रम घेतले जातील.
- शाळेच्या दाखल्यात वडिलांच्या नावाबरोबर आईचे नाव घालण्याच्या निर्णयाचा पाठपुरावा.
- लिंगसमभावासाठी शालेय अभ्यासक्रमातील गाभाघटकांमध्ये स्त्री-पुरूष समानता या मूल्याचा विचार करण्यात येईल.

१३. सर्व शिक्षा अभियान (२००१ ते २०१२)

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी हे अभियान

उद्दिष्टे

- २००७ पूर्वी प्राथमिक शिक्षणातील सर्व स्तरावरील उणिवा दूर करून सामाजिक लिंगभेद दूर करणे,
- २०१० पर्यंत प्राथमिक शिक्षणाची सर्वांची समान पातळी निर्माण करणे आणि मुलामुलींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन
- प्राथमिक शिक्षणाच्या अंतिम टप्प्यापर्यंत त्यांना टिकविणे. उद्दिष्टानुसार विविध
- उपक्रम राबविले जात आहेत.
- मुलींचे शिक्षण हा सर्व शिक्षण अभियानाचा गाभा आहे. सर्व मुलींना
- शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या नवोपक्रमांसाठी विशेष अनुदानाची तरतूद
- (National Programme for Education of Girls
- at Elementary Level) a KGBV (Kasturba Gandhi Balika Vidyalaya)
- दोन स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. वाडी, वस्ती,
- तांड्यापर्यंत आज शिक्षण पोहोचलेले आहे. विविध जाती-जमातींच्या मुलींसाठी
- विविध योजना, शिष्यवृत्ती आहेत.

१४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा (२००९)

सहा चौदा वयोगटातील सर्व बालकांकरिता मोफत सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्यासाठी केंद्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ जम्मू आणि काश्मीर वरगळता सर्वत्र देशात लागू केला आहे. कायद्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी हक्क नियमावली तयार केलेली आहे. या कायद्यामध्ये पायाभूत भौतिक

सुविधा, समता, गुणवत्ता व समाज सहभाग ही चार क्षेत्रे आहेत. समता क्षेत्रामध्ये सर्व प्रकारच्या बालकांना समान संधी व सुविधा मिळाव्यात याची तरतूद केली आहे.

१५. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA)

एप्रिल २०१० पासून माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी राष्ट्रीय माध्यमिक सर्व शिक्षा अभियान सुरू झाले आहे. मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीकोनातून RMSA मधून गाठण्याची महत्वाची उद्दिष्टे -

- १४ ते १८ वयोगटातील मुलामुलींना चांगल्या प्रतीचे शिक्षण प्राप्त व्हावे, परवडावे आणि मिळावे.
- समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले मुली, अपंग, इतर वर्ग, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले अल्पसंख्यांक यांना विशेष संदर्भासह माध्यमिक शिक्षण प्रदान करणे.
- कोणतेही मूल त्याचे लिंग, परिस्थिती, अपंगत्व यामुळे शिक्षणापासून वंचित राहू नये.
- माध्यमिक शिक्षणाच्या गुणवत्तेत वृद्धी करणे.
- महिला शिक्षकांना राहण्याच्या जागेसाठी प्राधान्य देणे.
- मुलींसाठी वसतिगृह, निवासी शाळा, रोख प्रोत्साहन, शाळेचा गणवेश, पुस्तके, शौचालय इत्यादी सुविधा करणे.

१६. महिला धोरण (२०१४)

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने ५ फेब्रुवारी २०१४ रोजी तिसरे महिला धोरण जाहीर केले.

उद्देश

- महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी प्रागतिक दृष्टिकोन रुजवणे आणि पुरुषप्रधान मानसिकता बदलविणे.
- महिलांना सर्व क्षेत्रांत समान संधी मिळावी यासाठी आवश्यक ती साधानसामग्री उपलब्ध करणे.
- समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिलेल्या महिलांचे पुनर्वसन करणे, गहिर्णींच्या घरकामाला प्रतिष्ठा मिळवून देणे.
- अनुसूचित जाती-जमाती, भटक्या विमुक्त जमाती व अल्पसंख्यांक स्त्रियांवरील अन्याय दूर करण्याच्या तरतूदी या धोरणामध्ये अंतर्भूत आहेत.

वैशिष्ट्ये

- ✓ महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रागतिक प्रागतिक दृष्टिकोन रूजविणे व पुरुषप्रधान मानसिकता बदलणे.
- ✓ महिलांना सन्मानाने जगता याकरिता सर्व क्षेत्रांमध्ये समान संधी व त्यांना उद्दिष्ट साध्य करता येण्यासाठी वातावरण तयार करणे.
- ✓ समाजाच्या मुख्य स्तरापासून वंचित ठेवण्यात आलेल्या देवदासी, वेश्या, लोककलावंत महिला, तृतीयपंथी यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे.
- ✓ धर्म, जात, सत्ता, यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेविरुद्ध पाठबळ देणे. अशा हिंसा होणार नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवणे.
- ✓ निर्णयप्रक्रियेत समाजातील स्तरावरील महिलांच्या हिताचे व हक्कांची जपणूक आणि संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
- ✓ स्त्री-पुरुष जन्मदर ठेवण्यासाठी प्रभावी उपाय करणे.
- ✓ महिलांच्या पारंपारिक प्रतिमेला छेद देणारी, आधुनिक स्वबळावर असणारी प्रतिमा तयार करण्यासाठी आवश्यक प्रयत्न करणे.
- ✓ सरकारी अभिलेख्यांमध्ये महिलांना व मुलांना त्यांच्या पसंतीनुसार नाव लावण्याचा अधिकार सरकारने दिला. यामुळे सरकारी कागदपत्र अर्जामध्ये केवळ वडीलांचे किंवा पतीचे नाव लावण्याची सक्ती काढून टाकण्यात येईल. नाव किंवा आडनाव काय असावे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य राहील.

महिलांना संरक्षण देणारी भारतीय राज्यघटनेतील कलमे
(Women Protection Articles Indian Constitution)

- ➢ कलम २२८ अ - बलात्कारासारख्या अपराधामागील अत्याचार पीडित महिलेचे किंवा ओळख देणारी माहिती छापणे किवा प्रसिद्ध करणे. यासाठी दंडाची तरतूद करण्यात आहे.
- ➢ कलम २९४ - महिलेकडे पाहून सार्वजनिक ठिकाणी अश्लील किंवा असभ्य वर्तन करणे यासाठी ३ महिन्यांची शिक्षा किंवा सजा अथवा दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- ➢ हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ - हुंडा मागितल्यास ३ वर्षाची सजा व १५००० रूपये दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- ➢ कलम ३०४ ब - जन्मठेपेची शिक्षा निर्धारीत करण्यात आलेली आहे.

- कलम ३१३ - महिलेच्या संमतीशिवाय गर्भपात केल्यास जन्मठेप किंवा १० वर्षे शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३१४ - महिलेच्या संमतीशिवाय केलेल्या गर्भपाताच्यावेळी महिलेचा मृत्यू झाल्यास ७ वर्षे सजा किंवा जन्मठेप दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३२३ - पत्नीला मारहाण, सामान्य जखमा केल्यास ५ वर्षे तुरुंगवासाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३२५ - पत्नीला मारहाण, गंभीर जखमा झाल्यास ७ वर्षे सजा दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३४२ - अवैधरीत्या डांबून ठेवल्यास १ वर्षाची सजा होऊ शकते.
- कलम ३५४ - हल्ला करणे किंवा गुन्हेगारी ताकदीचा वापर करून महिलेचा विनयभंग केल्यास २ वर्षाची सजा व दंड होऊ शकतो.
- कलम ३६३ - स्त्रीचे/मुलीचे अपहरण केल्यास ७ वर्षे शिक्षेची तरतूद आहे.
- कलम ३६४ - खून करण्यासाठी अपहरण केल्यास किंवा पळवून नेल्यास १० वर्षे सजा, दंड किंवा दोन्हीही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.
- कलम ३६६ - विवाहासाठी महिलेला पळवून नेणे, अपहरण केल्यास, किंवा जबरदस्ती केल्यास १० वर्षे सजा, दंड किंवा दोन्हीची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३६६ अ - अल्पवयीन मुलींना विवाहासाठी पळवल्यास १० वर्षे सजा व दंडाची तरतूद आहे.
- कलम ३६६ अ - परदेशातून मुलींना पळवून आणल्यास १० वर्षे सजा व दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३६९ - अल्पवयीन मुलींना त्यांच्याजवळील वस्तूंची चोरी करण्यासाठी पळवल्यास ७ सजा, दंड किंवा दोन्हीची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३७० - एखाद्या मुलीला किंवा महिलेला गुलाम बनविण्यासाठी विकत घेतल्यास किंवा तिची विल्हेवाट लावल्यास ७ वर्षे सजा, दंड किंवा दोन्हीची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३७२ - अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसायासाठी १० वर्षांची सजा होऊ शकते.
- कलम ३७३ - अल्पवयीन मुलीस वेश्या व्यवसायासाठी विकत घेतल्यास १० वर्षांची सजा होऊ शकते.
- कलम ३७६ - बलात्कार केल्यास ७ ते १० वर्ष सजा होऊ शकते
- कलम ३७६ अ - कायद्याने वेगळे राहणाऱ्या पत्नीबरोबर संभोग केल्यास २ वर्षांची सजा होऊ शकते.

- कलम ३७६ ब - आपल्या अधिकाराखालील सरकारी नोकरीतील महिलेसोबत संभोग (कस्टडी रेप) केल्यास ५ वर्षांची सजा, दंड किंवा दोन्हीची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ३७६ क - तुरुंगाधिकारी किंवा अधिकारातील महिलेशी संभोग केल्यास ५ वर्षांची सजा होऊ शकते.
- कलम ३७६ ड - एखाद्या रुग्णालयात व्यवस्थापन सदस्याने रुग्णालयातील महिलेशी संभोग केल्यास ५ वर्षांची सजा व दंड होऊ शकतो.
- कलम ४९० - कायदेशीर विवाह नसताना समारंभ घडविल्यास ७ वर्षे सजा व दंडाची तरतूद आहे.
- कलम ३९३ - कायदेशीर विवाह आहे असे भासवून एखाद्या महिलेला फसवून तिच्या सोबत पुरुष फसवून राहत असल्यास १० वर्षांची सजा व दंडाची तरतूद आहे.
- कलम ४९४ - अवैधरित्या दुसरी पत्नी केल्यास ७ वर्षे सजा व दंड होऊ शकतो.
- कलम ४९५ - व्दीभार्या प्रतिबंधक कलम - पहिले लग्न लपवून दुसारे लग्न केल्यास १० वर्षांची सजा व दंड होऊ शकतो.
- कलम ३९७ - व्यभिचार केल्यास ५ वर्षांचा सजा व दंड होऊ शकतो.
- कलम ४९८ - विवाहीत महिलेला गुन्हेगारी वृत्तीने अटकाव केल्यास किंवा घेऊन गेल्यास २ वर्षांची सजा व दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम ४९८ अ - नवविवाहितेचा हुंड्यासाठी किंवा इतर कारणाने शारीरिक किंवा मानसिक छळ केल्यास ३ वर्षांची सजा, दंड किंवा दोन्हींची तरतूद करण्यात आली आहे.
- कलम ५०९ - एखाद्या महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने तिच्याकडे पाहिल्यास, शब्द उच्चारल्यास, अथवा कृती केल्यास १ वर्षाची सजा, दंड किंवा दोन्हींची तरतूद करण्यात आली आहे.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न १ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

१. युनोने जाहिर केलेले आंतरराष्ट्रीय महिला वर्ष कोणते?
२. खऱ्या अर्थाने लैंगिक समानतेचा विचार कोणता धोरणाने केला?
३. स्त्री-पुरुष भेदभाव नको असे भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमात नमूद केले आहे?
४. युनोने घोषित केलेले आंतरराष्ट्रीय महिला वर्ष कोणते?
५. स्वतंत्रपणे महिला धोरण जाहीर करणारे भारतातील पहिले राज्य कोणते?
६. कोणत्या वर्षी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान सुरू झाले?
७. महाराष्ट्रात महिला विद्यापीठाची स्थापना कोणी केली?

प्रश्न २ खालील प्रश्नांची २५० शब्दांमध्ये उत्तरे लिहा. (५ गुण)

१. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची उद्दिष्टे लिहा

प्रश्न ३ खालील प्रश्नांची ८०० शब्दांमध्ये उत्तरे लिहा. (१० गुण)

१. स्त्री अभ्यासाकडून लिंगसमभाव अभ्यासाकडे बदल झाला आहे चर्चा करा.

घटक ३ अभ्यासक्रमातील लिंगभाव
UNIT III- GENDER IN CURRICULUM

उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही

१. माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तक आणि आशयातील लिंगभाव समजू शकाल.
२. लिंगभाव संदर्भात वर्ग व्यवस्थापनातील शिस्त व अध्यापन शास्त्र प्रक्रिया स्पष्ट करू शकाल.
३. एकविसाव्या शतकातील अभ्यासक्रम आराखड्यात लिंगभावाची रचना स्पष्ट करू शकाल.
४. लिंगभाव संदर्भात शिक्षक बदलाचा प्रतिनिधी म्हणून शिक्षकाची भूमिका सांगू शकाल.
५. मुला मुलींकडून उच्च अपेक्षा बाळगणाऱ्या शिक्षक-पालक यांचा दृष्टिकोन बदलण्यासाठीचे मार्ग स्पष्ट करू शकाल.

	a) Gender in text and context in secondary level (Text Book), disciplines classroom management or processes including pedagogy. अ) माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तक आणि आशयातील लिंगभाव, वर्ग व्यवस्थापनातील शिस्त व अध्यापन शास्त्र प्रक्रिया	

लिंगसमभाव निर्माण करण्याचे एक प्रमुख साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. या संदर्भातील नवीन मूल्यांची रुजवणूक खालील बाबांच्या माध्यमातून करता येते.

- अभ्यासक्रम
- पाठ्यपुस्तके
- शिक्षण प्रशिक्षण
- निर्णय प्रक्रियेत सहभाग
- प्रशासन

माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तक आणि आशयातील लिंगभाव

अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके यामधून लिंगभाव व स्त्री सबलीकरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी "All teachers and instruments will be trained as agent of women's empowerment." असे १९९२ च्या कृतिकार्यक्रमामध्ये (Action Plan) स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके व यांच्या माध्यमातून लिंगसमभाव निर्मितीसाठी शिक्षकांना यासंबंधाने निश्चित मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे.

भाषा विषयांचे अध्यापन करताना शिक्षकाची भूमिका (Role of the Teacher)

1. श्रवण व वाचन क्षेत्रातील गाणी, गोष्टी अथवा अन्य मजकुरामध्ये मुला-मुलींना समान प्रतिनिधित्व द्यावे.
2. स्त्रियांच्या परंपरागत भूमिकांचे वर्णन टाळावे. धाडसी, आत्मविश्वासू, स्वावलंबी अशा प्रतिमा जाणीवपूर्वक निवडाव्यात.
3. मुले घरकामात सहजपणे मदत करत आहेत मुली घराबाहेरचे काम करत आहेत हे जाणीवपूर्वक सांगावे.
4. भाषा स्त्री-पुरुष भेदभाव रहित असावी. नकारात्मक विशेषणांचा वापर करणे टाळावे.
5. एकमेकांशी बोलताना नम्रपणे हळूवार बोलण्याची सवय लावावी.
6. निबंध, पत्रलेखनासाठी कर्तबगार स्त्रियांसंबंधीचे विषय जाणीवपूर्वक निवडावेत.
7. देशाच्या विकास प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग समजून घेण्यास मदत करावी.
8. मुले-मुली एकमेकांशी बोलत असताना उचित शब्दांचा वापर करतात का यासाठी प्रयत्न करावा.
9. कर्तबगार महिलांची माहिती शाळेच्या सूचना फलकावर लावावी.
10. पत्रलेखनासाठी पुढील विषय देता येईल १) तुमची मोठी बहीण जिल्ह्याच्या गावी वैद्यकीय शिक्षण घेत आहे तिला पत्र लिहा.

गणित विषयांचे अध्यापन करताना शिक्षकाची भूमिका (Role of the Teacher)

1. शाब्दिक उदाहरणाद्वारे लिंगसमभाव प्रस्थापित करावे. उदा. आईला स्वयंपाकासाठी दीड तास वेळ लागतो. नंतरचे आवरण्यासाठी दीड तास वेळ लागतो तर आईला किती वेळ काम करावे लागते? हेच काम दोघांनी मिळून केले तर किती वेळात होऊ शकेल?
2. छोट्या आणि मोठ्या कुटुंबाचे फायदे-तोटे सांगून अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण या संदर्भात वर्गात मुलांमुलींची चर्चा घडवून आणणे.
3. सांख्यिकी माहिती गोळा करताना मुलांना व मुलींना समान संधी द्यावी. सांख्यिकी माहिती ही मुले व मुलींच्या क्षेत्रांशी संबंधित असावी.

विज्ञान विषयांचे अध्यापन करताना शिक्षकाची भूमिका (Role of the Teacher)

1. स्त्री-पुरुष यांच्यातील कान, नाक, डोळे, मेंदू, हृदय इत्यादी अवयवांची रचना व त्यांची कामे यात जैविक समानता आहे. काही बाबतीत असलेला जीवशास्त्रीय फरक (Biological difference - sex identification) म्हणजे असमतोल होय. परंतु लिंगसमभाव निर्माण करण्यासाठी जैविक घटकांचा कोणताही प्रभाव नसतो हे विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट करावे.
2. इंधन शक्ती स्त्रोतांचा वापर काटकसरीने करणे ही स्त्री व पुरुष दोघांची जबाबदारी आहे हे ठसवून सांगावे.

3. निसर्गात उपलब्ध असणाऱ्या सर्व घटकांचा उपयोग करण्याचा स्त्री पुरुष यांना समान हक्क आहे.
4. समाजाच्या विकासात पर्यायाने राष्ट्र विकासात पुरुष व स्त्रीचा समान सहभाग आवश्यक आहे. म्हणून विकासासाठी समान संधीची गरज आहे.
5. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेले प्रश्न, तिचे दुष्परिणाम ही दोघांची जबाबदारी आहे. या संदर्भातील निर्णयात दोघांना समान अधिकार असणे आवश्यक आहे.
6. योग्य शारीरिक वाढीसाठी व आरोग्यदायी जीवनासाठी समतोल आहाराची गरज दोघांनाही आहे.
7. माणसांचे आरोग्य स्वच्छतेवर अवलंबून आहे म्हणून घरातील साफसफाईचे काम, वर्गाची साफसफाई सर्वांनी मिळून करायला हवी हे विद्यार्थ्यांमध्ये बिंबविणे आवश्यक आहे.

सामाजिक शास्त्रे विषयांचे अध्यापन करताना शिक्षकाची भूमिका (Role of the Teacher)

1. आधनिक संस्कृतीची पाया भरणी, प्रबोधन युगात व क्रांती युगातील स्त्री-पुरूषांच्या योगदानाची माहिती देणे.
2. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी केलेल्या कामगिरीचा परिचय करून देणे.
3. सामाजिक चळवळीतील स्त्री-पुरुषांच्यात निर्माण झालेल्या सुधारणावादी दृष्टिकोनांचा परिचय करून देणे.
4. समाजातील दुर्बल घटक आणि महिला सबलीकरणाची जाणीव निर्माण करणे.
5. भारतीय नागरिक म्हणून आपली भूमिका स्पष्ट करून सांगताना स्त्री पुरुषांच्या कर्तव्याचा आणि जबाबदाऱ्या यांचा परिचय करून देणे.
6. देशाच्या संविधानानुसार स्त्री-पुरुषांना मिळालेल्या समान अधिकाराची जाणीव करून देणे.
7. वाहतुकीच्या साधनांचा वापर मुलांप्रमाणे मुलीही करत असल्याचे विद्यार्थ्यांना सहजगत्या लक्षात आणून द्यावे.
8. राष्ट्राच्या आर्थिक विकासात स्त्रियांचे योगदान कशाप्रकारचे आहे हे उदाहरणांच्या साहयाने सांगावे व विविध आर्थिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांची माहिती घेण्यास सांगावे.

कला विषयांचे अध्यापन करताना शिक्षकाची भूमिका (Role of the Teacher)

1. आत्मप्रगटीकरणाच्या संदर्भात लहानपणापासून मुलगी म्हणून बंधने असणाऱ्या मुलींना जाणीवपूर्वक प्रोत्साहित करणे.
2. पारंपारिक भूमिकामधील स्त्रियांची चित्रे काढण्याची सवय जाणीवपूर्वक कमी केली पाहिजे.

3. कोणत्याही कलेच्या माध्यमातून Sex symbol म्हणून स्त्रीचे चित्रीकरण करणे टाळले पाहिजे.
4. मुखवटे बनवणे, लाकूड कोरीव काम, शाळेच्या भिंती समवणे इ. सर्व कामांमध्ये दोघांचाही जाणीवपूर्वक सहभाग घेतल्यास कोणतेही काम लिंगावर आधारित नाही मुलांना समजेल.

कार्यानुभव विषयांचे अध्यापन करताना शिक्षकाची भूमिका (Role of the Teacher)

1. सामूहिक कामकाज/ प्रकल्पामध्ये जबाबदाऱ्याचे वाटप करतांना लिंगभेदभाव रहित दृष्टिकोन ठेवणे.
2. समाजातील उत्पादक कामासंबंधी माहिती गोळा करीत असतांना विविध ठिकाणी कार्यालयात, फॅक्टरीत किती स्त्रिया कोणकोणत्या प्रकारचे काम संबंधीची माहिती गोळा करण्यास सांगणे त्यावर चर्चा घडवून आणणे.
3. समाजातील विविध महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्त्री पुरुष दोघांमध्येही सारख्याच क्षमता असतात ही गोष्टी उदाहरणांच्या माध्यमातून बिंबवणे.
4. स्त्री पुरुष यांच्या किंवा सर्वच मानवी घटकांच्या आपसातील सहकार्य समजूतदारपणामुळे कामे अधिक नेटनेटकी, कमी वेळात, कमी श्रमात होतात हे उदाहरणातून दाखवून देणे.

वर्ग व्यवस्थापन आणि अध्यापन शास्त्र (Classroom management and processes including pedagogy)

व्यापक दृष्टिकोनातून विचार केल्यास वर्गात दोन प्रकारच्या वातावरण निर्मितीची आवश्यकता असते.

- **भौतिक वातावरण -** भौतिक वातावरणात वर्गखोल्यांचा आकार, वायुवीजनाची व्यवस्था, प्रकाश, आवश्यक फर्निचर आणि साधनांचा समावेश होतो. अर्थपूर्ण आणि परिणामकारक अध्ययन अध्यापनासाठी हे आवश्यक आहे.
- **सामाजिक वातावरण -** सामाजिक वातावरणात शिक्षक-विद्यार्थी, विद्यार्थी-विद्यार्थी आणि समूह गट यांच्यातील वर्तनाचा, परस्पर संबंधाचा समावेश होतो.

लिंगभावासाठी अनुकूल वातावरण (Gender friendly Environment)

1. मुले आणि मुलींना एकत्र बसण्यास प्रोत्साहन द्यावे. पटक्रमांकानुसार बसण्याची व्यवस्था करावी.
2. विद्यार्थ्यांना वर्गात मोकळेपणाने हालचाल करता येईल इतकी जागा दोन ओळीमध्ये राहील याची दक्षता घ्यावी.

3. प्रासंगिक अथवा चर्चेच्या वेळी मुले व मुली समोरासमोर बसून चर्चा करतील अशा प्रकारची व्यवस्था वर्गखोल्यांमध्ये असावी.
4. माहिती फलकांची जोडणी (व्यवस्थापन) अशाप्रकारे केली पाहिजे की जेणेकरून मुले आणि मुली सहजपणे ती माहिती वाचू शकतील अथवा स्पष्टपणे त्यांना दिसेल.
5. शिक्षकांनी वर्गात अध्यापन करताना लिंगसमभाव पक्षपात अथवा पारंपारिक गोष्टी, घटना विद्यार्थ्यांसमोर सादर करू नये.
6. वर्गात मुले आणि मुली एकमेकांच्या अध्ययन विचारांची देवाणघेवाण करतील अशी वर्ग व्यवस्था करावी.

वर्गातील आंतरक्रिया (Classroom Interaction)

- भाषा, विज्ञान, सामाजिक शास्त्रे यासारख्या विविध विषयांचे अध्यापन करताना शिक्षकांनी मुला-मुलींना समान प्रश्न विचारावेत.
- वर्गात जी मुले-मुली लाजाळू आहेत, कमी बोलतात, सहभागी होत नाहीत असे विद्यार्थी शोधून त्यांना सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- स्वच्छता, सुशोभिकरण वाटून द्यावे.
- मुला-मुलींना दुसऱ्यांच्या विचारांचा आदर करण्यास शिकवावे.
- विद्यार्थ्यांसाठी अपशब्द वापरू नये, वर्गातील इतर मुलांपुढे एखाद्या मुला-मुलीचा अपमान होईल असे वर्तन शिक्षकांनी कटाक्षाने टाळावे.
- बक्षिस अथवा पारितोषिक देताना लिंगसमभाव विचारात घेऊन यशाचए कौतुक करावे.
- वर्गात आणि वर्गाबाहेर मुले आणि मुलींच्यामध्ये निरोगी स्पर्धा राहील यासाठी प्रोत्साहन देणे.
- चर्चा, नाट्यीकरण, बुद्धीमंथन, प्रकल्प, गट कार्य इत्यादी पद्धतींचा वापर करावा.

	b) Construction of Gender in Curriculum framework of 21st century. **ब) एकविसाव्या शतकातील अभ्यासक्रम आराखड्यात लिंगभावाची रचना**	

विज्ञान अभ्यासक्रम व लिंगभाव

- ✓ विज्ञान विषयाचे अध्यापन करीत असताना आशयाला अनुसरून स्त्री शास्त्रज्ञांची उदाहरणे द्यावीत. त्यांचे विज्ञानातील योगदान स्पष्ट करून सांगावे.
- ✓ सर्व प्रयोगामध्ये मुले आणि मुलींना सहभागी करून घ्यावे.
- ✓ प्रकल्प कार्यात मुले आणि मुलींचा सहभाग याकडे विशेष लक्ष पुरविणे.
- ✓ जैविक घटक, नैसर्गिक स्रोत, जीवन प्रक्रिया, अनुवंश आणि उत्क्रांती आणि आपले पर्यावरण इत्यादी घटकांची चर्चा करताना लिंगसमभाव कृतींचा समावेश करावा.

- ✓ अन्नाचे घटकाची चर्चा करताना विविध प्रकारच्या पिकांच्या उत्पादनात स्त्रियांची भूमिका स्पष्ट करावी.
- ✓ रासायनिक अभिक्रिया आणि समीकरण शिकविताना घरगुती उहारणांचा समावेश करावा. उदा. लोणच्याची तयारी, जाम तयार करण्याची प्रक्रिया इ.

गणित अभ्यासक्रम व लिंगभाव

- ✓ अध्ययन अध्यापन प्रक्रियेत संदर्भानुसार स्त्री गणिततज्ञांचा परिचय करून दिला पाहिजे.
- ✓ विविध गणितीय उपक्रमात आणि प्रकल्पात मुले आणि मुलींना सहभागी करून घेणे.
- ✓ संख्याशास्त्रीय संबंधित आशय सादर करताना भारतातील आणि राज्यातील शाळेत नोंदणी झालेल्या मुला-मुलींचे प्रमाण, असमानता, गळतीचे प्रमाण, मुलींचे घटते प्रमाण इत्यादीचे सादरीकरण करणे आवश्यक आहे.

भाषा अभ्यासक्रम व लिंगभाव

- ✓ भाषा आणि साहित्य क्षेत्रातील नामवंत/विख्यात स्त्रियांच्या कामगिरी व योगदानाबाबत प्रकल्प कार्य हाती घेणे.
- ✓ स्त्रियांच्या बाबतीत ख्यातनाम भारतीय विचारवंतांचे विचार संग्रह करणे आणि विविध भाषांमध्ये भाषांतरित करणे.
- ✓ भाषा विषयांच्या तासांच्या वेळी शिक्षकांनी लिंगभाव संदर्भात सर्वसमावेशक असे ते (they), त्यांना (them), आम्हाला (us), आम्ही (we), तू (you), तो/ती (he/she), तिला (her) यासारखे शब्द वापरावेत.
- ✓ लिंगभाव समानतेवर विद्यार्थ्यांना निबंध लिहिण्यास सांगावे.

समाजशास्त्र अभ्यासक्रम व लिंगभाव

- ✓ फ्रेंच आणि रशियन राज्यक्रांतीचा स्त्रियांचे जीवन आणि राहणीमा यावर झालेला परिणाम या संदर्भात चर्चा घडवून आणणे.
- ✓ क्रांतिकारी स्त्रिया, विशेष कामगिरी करणाऱ्या स्त्रिया, कला, क्रीडा क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादन केलेल्या स्त्रियांबाबत थोडक्यात माहिती लिहीणेस सांगणे,
- ✓ शेती, उद्योग, सेवा विभागात कार्यरत असणाऱ्या स्त्री-पुरुष यांच्या संदर्भात चर्चा सत्राचे आयोजन करावे.
- ✓ लोकसंख्येची रचना, भारतीय लोकसंख्या, साक्षरतेचे प्रमाण, स्त्री-पुरुष यांचे हजारी प्रमाण, शाळेत दाखल झालेली मुले-मुली, गळतीचे प्रमाण इत्यादी संदर्भात शैक्षणिक साहित्याची निर्मिती विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे, त्यासंदर्भात प्रदर्शन भरवावे. लिंगसमभाव दर्शविणाऱ्या शैक्षणिक साधनांना बक्षिस द्यावे.

- ✓ स्त्री-पुरुष समभाव निर्माण करण्यासाठी शासनाकडून व समाजाकडून केलेले प्रयत्न, अडचणी, फलित या संदर्भात विद्यार्थ्यांना प्रकल्प कार्य द्यावे.
- ✓ आपल्या वस्तीस्थानाचे जतन व रक्षण करण्यातील स्त्रियांची भूमिका या संदर्भात पोस्टर अथवा मॉड्यूलर्स तयार करणे.
- ✓ पर्यावरणवादी स्त्रियांचे चरित्र अभ्यासणे.
- ✓ शासनाच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या स्त्रियांच्या संदर्भात सामान्य ज्ञानाची चाचणी (Quiz) घेणे.

	c) Teacher as an agent of change. **क) शिक्षक बदलाचा प्रतिनिधी**	

1. शिक्षकाने लिंग समभाव निर्माण होण्यासाठी वर्गात मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण केले पाहिजे.
2. वर्गात भौतिक व सामाजिक वातावरण निर्माण करून मुला-मुलींच्यामध्ये निरोगी संबंध प्रस्थापित केले पाहिजेत.
3. अध्ययन अध्यापन प्रक्रियेत मुला-मुलींना समान सहभागाची संधी उपलब्ध करून दिली
4. मुलींचा जास्तीत जास्त सहभाग वाढविण्यासाठी भूमिका अभिनय, समस्या निराकरण पद्धती, प्रकल्प पद्धती, सहकारशील अध्ययन इ. कार्यनीतीचा वापर केला पाहिजे.
5. वर्ग स्वच्छतेच्या संदर्भात मुला-मुलींच्यामध्ये कोणताही भेदभाव न करता समान काम वाटून दिले पाहिजे.
6. अभ्यासपूरक उपक्रमात मुला-मुलींना समान जबाबदारी दिली पाहिजे.
7. परिणामकारक मौखिक संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी मुला-मुलींना एकत्र वाचनाची आणि पाठांतराची संधी दिली पाहिजे.
8. लिंग समभाव निर्माण होण्यासाठी शिक्षकांनी अध्ययन - अध्यापन प्रक्रिया चालू असताना संदर्भानुसार विशेष कामगिरी, अथवा यश संपादन केलेल्या स्त्रियांची उदाहरणे द्यावीत.
9. घरात स्त्री-पुरुष एकत्र स्वयंपाक व अन्य कामे करीत आहेत. अशा आशयाची दृश्य साधने विद्यार्थ्यांना दाखविली म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये सर्वसमावेशक लिंग समानता निर्माण होते.
10. चित्र काढणे, रंगकाम करणे, नृत्य करणे, गाणे म्हणणे, संगीत इत्यादी कार्यक्रमास मुलांना आणि मुलींना समान संधी दिली पाहिजे.

	d) Ways for reduced teacher, Parents, Attitudes to have high expectations of all girls and boys. **ड) मुला मुलींकडून उच्च अपेक्षा बाळगणाऱ्या शिक्षक-पालक यांचा दृष्टिकोन बदलण्यासाठीचे मार्ग**	

- बाल मानसशास्त्राचा परिचय
- प्रत्येक मुल स्वतंत्र आहे यांची जाणीव
- बुद्धिमत्ता व क्षमतांचे मापन
- अध्ययन शैलीचा शोध घेणे
    - श्राव्य अध्ययन शैली (Audio Learning style)
    - दृक अध्ययन शैली (Visual Learning style)
    - कृतीव्दारा अध्ययन (Kinesthetic Learning style)
- मार्गदर्शन समुपदेशन कक्षाची स्थापना
- शिकण्याची असमर्थता

आपली प्रगती तपासा.

प्रश्न १ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

१. शिक्षणामध्ये बदलाचा दूत कोण आहे?
२. अभ्यासक्रमात लिंगभाव बदलाचा मध्यस्थ कोण?

प्रश्न २ खालील प्रश्नांची ८०० शब्दांमध्ये उत्तरे लिहा. (१० गुण)

१. लैंगिक समानताचा अर्थ लिहा अभ्यासक्रमाद्वारे लैंगिक समानतेसाठीचे कृती कार्यक्रम सुचवा.
२. अभ्यास पूरक व अभ्यासेतर उपक्रमातून लिंग समभाव कसा वाढवाल? सोदाहरण स्पष्ट करा
३. माध्यमिक स्तरावरील कोणत्याही एका इयत्तेच्या लिंग संभावती संबंधित असे स्पष्ट करा यासाठी विद्यार्थ्यांकरिता उपक्रम सुचवा
४. शाळा आणि समाज यामध्ये लिंग समभाव विकसित करण्यासाठी शिक्षक म्हणून तुम्ही कशी भूमिका कराल?

UNIT IV: - GENDER, SEXUAL HARASSMENT AND ABUSE
घटक ४ लिंगभाव, लैंगिक छळ व दुरुपयोग

उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही

१. लैंगिक छळ शब्दाचा अर्थ, स्वरूप स्पष्ट करू शकाल.
२. लैंगिक छळाचे प्रकार व कारणे सांगू शकाल.
३. सामाजिक व भावनिक संघर्षाची ठिकाणे सांगू शकाल.
४. लैंगिक छळ सातत्याने घडून येणारे ठिकाणे स्पष्ट करू शकाल.

	a) Meaning, nature types and reasons of harassment. अ) लैंगिक छळ शब्दाचा अर्थ, स्वरूप प्रकार व कारणे	

विशाखा मार्गदर्शक तत्वे

- अल्पवयीन मुलींचा विवाह करू नये म्हणून भँवरीदेवी गावकऱ्यांचे प्रबोधन करण्याचे काम करत होत्या.
- इ.स.१९९० मध्ये राजस्थानमध्ये काही उच्च जातीय जमीनदारांनी भँवरीदेवी या दलित महिलेवर सामुदायिक बलात्कार केला.
- न्याय मिळवण्यासाठी तिने न्यायालयाचे दरवाजे ठोठावले परंत न्यायालयाने तिच्या विरोधात निकाल दिला.
- या निकालाच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांसाठी काम करणाऱ्या महिला स्वयंसेवी संघटनेने विशाखा नावाने सर्वोच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका दाखल केली.
- या याचिकेवर इ.स. १९९७ साली सर्वोच न्यायालयाने जो निकाल दिला तो निकाल म्हणजेच विशाखा निकाल किंवा विशाखा मार्गदर्शक तत्वे होत.

या मार्गदर्शक तत्वानुसार लैंगिक छळामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो...

- शारीरिक स्पर्श/ संपर्क (अस्वागतार्ह) आणि कामोद्दिपक प्रणय चेष्टा
- शरीर सुखाची (लैंगिक सौख्याची) मागणी अथवा विनंती
- लैंगिक वासना प्रेरित करणारे शेरे
- कोणत्याही स्वरुपातील संभोग वर्णन/संभोग दर्शन अश्लील साहित्याचे प्रदर्शन. कामूक व अश्लील चित्रे दाखविणे किंवा एसएमएस, ईमेल करणे.
- लैंगिकता सूचक कृती, शारीरिक, मौखिक किंवा निःशब्दपणे केलेली अन्य कोणतीही कृती

व्याख्या

- Sexual harassment is unwanted sex that is economically enforced.
- Sexual harassment is sometimes described as 'Little vapes'
- The European Union has introduced a code of practice on sexual harassment in the workplace which defines sexual harassment as unwanted conduct of a sexual natures or other conduct based on sex affecting the dignity of women.
- In Canada, the Canada labor code defines sexual harassment as follows sexual harassment means any conduct, comment, and gesture or contact of a sexual nature.
- लैंगिक छळ म्हणजे स्त्रीच्या इच्छेविरूद्ध, तिच्या नाही बोलण्याच्या अधिकाराविरूद्ध झालेली कोणत्याही प्रकारची लैंगिक क्रिया यामध्ये बलात्कार, शारीरिक स्पर्श, लैंगिकतेने बोलणे, अश्लील चित्रे किंवा चित्रपट दाखविणे, अश्लील शेरे, अशोभनीय शारीरिक, तोंडी अथवा सांकेतिक आचरण इत्यादीचा समावेश होतो.

लैंगिक छळाचे प्रकार (Types of Sexual Harassment)

ले व स्टीवर्ट (Lay and Stewart) यांनी लैंगिक छळाचे चार प्रका सांगितले आहेत.

1. शाब्दिक समालोचन (Verbal Commentary) लैंगिक संदेश पाठविणे, अश्लील विनोद सांगणे याचा समावेश होतो.
2. शाब्दिक तडजोडीची बोलणी (Verbal negotiation)
3. धक्काबुक्की करणे (Manhandling)
4. हिंस्र शारीरिक हल्ला (Sexual assault)

लैंगिक छळाच्या घटना कोणत्या ठिकाणी घडतात यावरून त्याचे दोन प्रकार पडतात.

1. समाजामध्ये घडून येणारा लैंगिक छळ
2. कामाच्या ठिकाणी घडून येणारा लैंगिक छळ

लैंगिक छळाची कारणे

1. पुरुषी मानसिकता
2. मासिके व इतर अश्लील साहित्य
3. इंटरनेट
4. शाळेचे वातावरण
5. टि.व्ही.
6. चित्रपट
7. व्हिडिओ गेम्स

	b) Sites of Conflict Social and Emotional	

ब (संघर्षाची ठिकाणे : सामाजिक व भावनिक)

सामाजिक व भावनिक (Sites of Conflict: Social and Emotional)

जेव्हा दोन अथवा अधिक प्रेरणा एकाचवेळी निर्माण होतात, पण त्यांची पूर्तता करणे शक्य नसते, त्यावेळी संघर्ष निर्माण होतो. ज्यावेळी भावनिक गरजा पूर्ण करू शकत नाही तेव्हा भावनिक संघर्ष निर्माण होतो.

भावनिक संघर्षाची व्याख्या

- "The state of disharmony between incompatible intense emotions such as love and desire."
- प्रेम आणि इच्छा यासारख्या भावनांमध्ये तीव्र विसंगती निर्माण होऊन विसंवादाचे राज्य निर्माण होणे.
- "Emotional Conflict are love hate relationships with things."
- भावनिक संघर्ष म्हणजे विचारामध्ये प्रेम आणि तिरस्कार संबंध निर्माण होणे.

सामाजिक संघर्षाची व्याख्या

- Social Conflict is the straggle for agency or power within a society. It occurs when two or more people appose one - another in social interactions, exerting social power in an effort to attain scare or incompatible goals, and prevent the opponent from attaining them.
- सामाजिक संघर्ष हा समाजातील संस्था आणि सत्ता यातील संघर्ष आहे. यामध्ये दोन किंवा अधिक लोक सामाजिक संवादामध्ये आपले उद्दीष्टे साध्य करण्यासाठी एकमेकांना विरोध करतात, एकमेकांना घाबरवतात किंवा सामाजिक शक्ती वापरतात आणि प्रतिस्पर्ध्याला ते मिळविण्यापासून रोखतात.
- भावनिक संघर्ष हा व्यक्तिअंतर्गत असू शकतो. उच्च शिक्षण पूर्ण करावे की विवाह करून स्वस्थ रहावे. याबाबतचा निर्णय एखाद्या स्त्रीला घेता न आल्याने तिच्या मनामध्ये भावनिक संघर्ष निर्माण होऊ शकतो. सामाजिक संघर्ष हा आंतरवैयक्तिक, समूह अंतर्गत व आंतरसामूहिक प्रकारचा संघर्ष असतो.

संघर्षाची ठिकाणे

१. कुटुंब
२. कामाची ठिकणे
३. प्रवासाची साधने
४. रस्ता
५. धार्मिक ठिकाणे

	c) Agencies perpetuating harassment: family, school, workplace and media (print & electronic) **क) लैंगिक छळ सातत्याने घडून येणारे ठिकाणे: कुटुंब, शाळा, कामाचे ठिकाण आणि प्रसारमाध्यम**	

१. कुटुंब
   - स्त्रीला दुय्यम स्थान
   - कौटुंबिक हिंसाचार
   - हुंड्यासाठी छळ
   - गर्भलिंग परीक्षणासाठी छळ

२. शाळा
   - शिक्षकांकडून वर्गात केलेला भेद
   - मुलांकडून झालेला छळ
   - शैक्षणिक उपक्रमातून होणारा भेद

३. कामाची ठिकाणे
   - मालक व प्रमुखाकडून
   - पूरूष सहकाऱ्याकडून

४. प्रसार माध्यमे
   - छापील व इलेक्ट्रानिक माध्यमे
   - जाहिराती
   - स्त्रीचे चित्रण विशिष्ट बाबींवर भर देऊन
   - नायकप्रधान चित्रपट
   - सोशल मिडीया

आपली प्रगती तपासा.

प्रश्न १ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

१. भवरीदेवी मुळे अस्तित्वात आलेल्या मार्गदर्शक तत्वांचे नाव लिहा.
२. ज्या स्त्रीमुळे विशाखा मार्गदर्शक तत्वे अस्तित्वात आली त्या स्त्रीचे नाव लिहा?

प्रश्न २ खालील प्रश्नांची २५० शब्दांमध्ये उत्तरे लिहा. (५ गुण)

१. लैंगिक शोषणाची कारणे लिहा
२. लैंगिक छळ सातत्याने घडून येणारी ठिकाणी लिहा

प्रश्न ३ खालील प्रश्नांची ८०० शब्दांमध्ये उत्तरे लिहा. (१० गुण)

१. लैंगिक छळ सातत्याने घडून येणाऱ्या ठिकाणांची चर्चा करा आणि लैंगिक छळाला कशा प्रकारे आळा घालाल?

अधिक वाचनासाठी संदर्भ साहित्य

१. Hamilton, Roberta. 1993. *Feminist Theories*, Left History, Volume 1.

२. National Council for Educational Research and Training 1975. National Curriculum Framework (NCF). New Delhi: Author.

३. NCERT (2005) National Curriculum Framework NCERT.

४. NCERT (2006a) Position paper –National focus group on education with special needs (NCF 2005)

५. NCERT(2006b) Position paper –National focus group on Gender issues on the curriculum (NCF 2005)

६. NCERT (2006C) Position paper –National focus group on problem of scheduled caste and Scheduled tribe children (NCF 2005), New Delhi. NCERT

७. मुलींचे शिक्षण लिंग समभाव दृष्टीकोन निर्मिती एस सी ई आर टी म. पुणे

८. स्त्री पुरुष समानता ताराबाई शिंदे

९. साने गिता- भारतीय स्त्री जीवन मौज प्रकाशन गृह

१०. आपटे ज. श. व रोडे पुष्पा - भारतातील महिला विकासाची वाटचाल डायमंड पब्लीकेशन

११. जाधव के. के. २००७ आधुनिक काळचे शिक्षण समाजशास्त्र मन प्रकशन नाशिक